## मन्याड नदी अमृतवाहिनी कार्यक्रम

## अर्थात मन्याड नदीला लोक सहभातून पुर्ववैभव देण्याचा प्रयत्न

**प्रस्तावना:**

मन्याड नदीचा उगम परळी तालुक्यातील धर्मापुरी परिसरातील डोंगरातून होतो आणि पुढे हि नदी १०३ किमी अंतर पार करून नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यात सगरोळी इथे मांजरा नदीला येऊन मिळते. साधारण ११३० फूट पातळीला ती मांजरा नदीला मिळते. नदीपात्राच्या वरच्या भागातील वृक्षतोड, विकास प्रकल्प आणि रासायनिक शेती मुळे मांजरा नदीत मोठ्या प्रमाणावर गाळ जमला आहे. तिचे पात्र उंच झाले आहे. तेथील जुन्या रहिवाशांच्या आठवणी प्रमाणे पात्र किमान सात ते आठफूट उचलेले गेले आहे. यामुळे तिला मिळणाऱ्या मन्याड आणि लेंडी नदीयांच्या पात्रावरही परिणाम झाला आहे. नदीचे पाणी मूळ पात्रातून कमी आणि ओढ्यांतून जास्त वाहू लागले आहे. काही ओढे नवीन निर्माण होऊन त्यांनी शेतजमिनीचे मोठे तुकडे पडले आहेत, यात पाणी तुंबल्यामुळे उत्पादकता फार मोठ्या प्रमाणावर कमी झाली आहे.

**प्रश्न मोठा आणि व्यापक आहे त्यावर उपायही मोठ्या प्रमाणावर करायला हवा आहे.**

**उपाय: सुरवात म्हणून मूळ प्रवाह पुन्हा त्याच्या जुन्या खोलीला नेणे आवश्यक आहे.**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त महाराष्ट्रातील ७५ नद्या अमृतवाहिनी करण्यासाठी शासनाने दिनांक २ ऑक्टोंबर रोजी वर्धा येथून सुरुवात केलेली आहे.या अभियानांतर्गत **संस्थेने मन्याड नदीचे पुनरुज्जीवन करण्याची जबाबदारी स्वीकारलेली असून त्यासाठी कृती कार्यक्रम हाती घेतला आहे.**

### अ) लोक सहभातून नदी पुनरुज्जीवन प्रकल्प:

या प्रकल्पातील लोकांमधील जाणीवजागृती हा पहिला टप्पा होता. मन्याड नदीची पूर्वीचे वैभव, सद्यस्थिती



याची कारणे, या ऱ्हासाला जबाबदार असणारे समाज घटक व संभाव्य उपाययोजना याविषयी लोकांमध्ये जाणीवजागृती निर्माण करण्यासाठी एका संवाद यात्रेचे आयोजन दि. १५ ऑक्टोंबर रोजी करण्यात आले. संवाद यात्रेची सुरुवात अटकळी येथे नदीपात्रात झाली. याप्रसंगी सद्गुरू सिद्धदयाळ स्वामी, बेटमोगरा संस्थान यांनी उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. याशिवाय नांदेड जिल्ह्यातील सद्गुरू चंद्रशेखर महाराज देगलूरकर, मौलाना हनीफ, देगलूर, विनय बोधी भन्ते, श्री. माधवराव पाटील शेळगावकर, डॉ. बालाजी चिरडे, डॉ. सुमंत पांडे, मा. अभिजित राऊत, जिल्हाधिकारी इत्यादी मान्यवरांनी चित्रफितीद्वारे लोक जागृतीचा

संदेश दिला. याशिवाय चलचित्र रथयात्रेद्वारे सर्व गावातून लोक जागृतीचे काम झाले. नदीच्या सद्यस्थितीची लोकांना स्पष्ट कल्पना यावी यासाठी अटकळी ते सगरोळी या अंतरातील नदी पत्राचे ड्रोनद्वारे छायाचित्रण करण्यात आले व ती फिल्म नदीकाठावरील गावातून दाखविण्यात आली. नदीपात्रात गाळ मोठय प्रमाणात साचला होता, पात्राच्या मद्यात लहान-मोठी बेटे तयार झाली होती. वझीरगा या गावाजवळ नदीने पात्राची दिशा



बदलली त्यामुळे जुने पात्र व नवीनपात्र यामध्ये अंदाजे ५०० एकराचे मोठे बेट तयार झाले. पावसाळ्यात शेती कामासाठी या बेटावर जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे अनेकांनी प्राणही गमावल्याची उदाहरणे आहेत. याठिकाणी एका जोड रस्त्याची आवश्यकता असल्याचे सर्वेक्षणात लक्षात आले. यानंतर मा. जिल्हाधिकारी श्री. अभिजित राऊत यांनी शेवाळा ते अटकळी असा प्रवास करून लोकांशी संवाद सादला व परिस्थिती जाणून घेतली. नदीपात्राची यामुळे नदी पुनुरीज्जीवीत करण्यासठी आवश्यक असणाऱ्या कामाची कल्पना आली.



यानंतर सगरोळी, शेवाळा, आलुर, शहापूर, वझीरगा, केसराळी, लिंबा आदि विविध गावातील लोकप्रतिनिधींची मा.जिल्हाधिकारी यांच्या सोबत बैठक होवून पुढील कामाचे दिशा ठरविण्यात आली. या बैठकीत शासनाच्या वन, जलसंधारण, कृषी विभागांनी तांत्रिक मार्गदर्शन केले. "यशदा", पुणे या संस्थेच्या जलसाक्षरता केंद्राचे निवृत्त संचालक मा. सुमंत पांडे हे नांदेड जिल्ह्याचे भूमिपुत्र कार्यक्रमात सुरुवातीपासूनच सक्रीय होते. त्यांनी संस्था व शासन यांच्यामधील समन्वयाचे काम प्रभावी पद्धतीने केल्यामुळे कार्यक्रमाला गती आली. या बैठकीत नाम फौंडेशनचे आर्थिक सहकार्य घेण्याचे ठरले. त्याप्रमाणे संस्कृति संवर्धन मंडळ, जिल्हा प्रशासन आणि नाम फौंडेशन यांच्यामध्ये त्रिपक्षीय सहनामा करण्यात आला. नाम फौंडेशनने गाळ उपशासाठी अवशाक्त्या संस्ख्येने पोकलेन मशीन देण्याचे मान्य केले. जिल्हा प्रशासनाने माशीनला लागणारे



डीझेल अखंडपणे पुरविण्याचे जबाबदारी घेतली. तर, प्रकल्पाचे स्थानिक व्यवस्थापनाची जबबदारी संस्थेने घेतली. स्थानिक व्यवस्थापनात गाळ उपशासाठी तांत्रिकदृष्ट्या योग्य जागा निवडणे, दोन पर्यवेक्षकाचे वेतन, ट्रॅक्टर गाळ वाहतुकीचे व्यवस्था, झालेल्या कामाचे व वेळेचे मोजमाप, माती व पाणी परीक्षण, संबंधित गावातून समिती स्थापन करणे व सदस्यासह ग्रामस्थांचे प्रशिक्षण, नदीकाठावर बांबू लागवड, झालेल्या कामाचे ड्रोन शुटींग, दस्तावेजीकारण, स्थानिक समस्याचे निराकरण, ग्रामस्थ, शासन तथा नाम फौंडेशन यांच्यामधील

समन्वय इत्यादी कामाचा समावेश होता. या कामासाठी लोकसहभागातून प्रति ट्रॅक्टर ३० रुपये शुल्क आकारण्यात आले.



दिनांक ०१ एप्रिल २०२३ रोजी वनमंत्री मा.ना. सुधीरजी मुनगंटीवार यांचे हस्ते कामास सुरुवात झाली. याप्रसंगी खासदार. श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार श्री. राजेश पवार, नाम फौंडेशनचे संचालक श्री. मल्हार नाना पाटेकर, श्री. खटके, जिल्हा जलसंधारण अधिकारी, श्री. केशव वाबळे, उप वन संरक्षक, श्री. रविशंकर चलवडे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, यांच्या उपस्थितीत नियोजन भवन, नांदेड येथे पार पडला. या प्रसंगी मन्याड नदीकाठावरील सरपंच, अनेक ग्रामस्थ, नदीप्रेमी



उपस्थित होते. १ तारखेपासूनच वझीरगा ता. देगलूर या गावाजवळील नदीपात्रात कामाला सुरुवात झाली. १०-१२ दिवसाच्या कामानंतर नाम फौंडेशनने आणखी एका मशीनने लिंबा या गावात कामाला सुरुवात करण्यात आली. दोन्ही ठिकाणी दररोज साधारण प्रत्येकी १५ ते २० ट्रॅक्टर गाळ वाहतुकीला होते. लोकांनी स्वखर्चाने गाळ शेतीत नेवून टाकला. यंदाच्या हवामान बदलाच्या प्रभावामुळे अनेकवेळेस चालू असलेल्या कामाला अवकाळी पावसाचा फटका बसला. त्यामुळे बऱ्याचदा सलग ३-४ दिवस काम बंद ठेवावे लागत होते. याशिवाय बारूळ येथे नदीवर मोठे धरण आणि बेटमोगरा याठिकाणी एक बंधारा आहे. एकदोन वेळेस अनावधानाने या बंधाऱ्यातील पाणी नदीपात्रात आल्यामुळे काही दिवस काम बंद ठेवावे लागले. नदीपात्रातील प्रवाह आणि चिखलामुळे वजनदार ट्रॅक्टर अनेकवेळेस रुतून बसत. तसेच



नदीकाठ आणि पात्रात रस्ते नसल्यामुळे अनेकदा फसलेला ट्रॅक्टर चिखलातून बाहेर काढणे आणि रस्ता तयार करणे याकामासाठीही काम बऱ्याचदा बंद राहिले. परंतु, सगळ्यात मोठी अडचण आली ती नदीपात्र आणि सीमांकन आणि त्याची क्षेत्र निश्चिती. विशेषतः वझीरगा, गळेगाव आणि लिंबा या गावात नदीच्या सिमंकानाविषयी लोक विशेष आग्रही होते. त्यामुळे साधारण महिनाभराच्या कामानंतर लोकांच्या सूचनेचा आदर करत या ठिकाणचे काम थांबवून नदी सीमांकानानंतर पुढील वर्षी काम परत चालू करण्याचे ठरले. या गावातील मशीन त्यामुळे नाम फौंडेशनला परत करण्यात येवून दुसऱ्या मशीनने आलुर या गावातील काम सुरु करण्यात आले. आलुर या गावी काही प्रमुख ग्रामस्थ, ग्रामपंचायत व शेतकरी यांच्यातील उत्तम समन्वय व सामंजस्यामुळे काम विनाखंड, जोमाने चालू राहिले. काही प्रसंगी उत्पन्न झालेल्या वादावर स्थानिक नेतृत्वाने समाधानकारक उपाययोजना केले.

 

या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंहजी राणा यांनी लिंबा ता. देगलूर या गावी कामास भेट देवून चालू असलेल्या कामाची पाहणी केली. नदीपात्रातच शेतकऱ्यांची एक छोटी बैठक होऊन शेतकऱ्यांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांना त्यांनी समाधानकारक उत्तर दिली . त्यामुळे प्रकल्पविषयीचे लोकातील अनेक गैरसमज दूर झाले. प्रकल्प भेटीनंतर डॉ. राजेंद्रसिंह यांनी शेजारच्याच शहापूर येथील जाहीर सभेत लोकांना संबोधित केले. या सभेस मन्याड नदीकाठावरील अनेक गावातून अंदाजे १५०० लोक उपस्थित होते. यात सरपंच, इतर लोक प्रतिनिधी, गावातील प्रमुख मंडळी यांच्यासह शासनाच्या तहसील, वन, जल संधारण, कृषि विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. वर्षा ठाकूर आवर्जून उपस्थित होत्या. डॉ. सुमंत पांडे यांनी मन्याड नदीचे पूर्व वैभव व सद्यस्थिती त्याचे पिक पद्धती आणि एकूणच लोकजीवनावर होत असलेले परिणाम याविषयी शास्त्रशुद्ध मांडणी केली. शेवटी राजेंद्रसिंहजी यांनी आपल्या प्रदीर्घ भाषणात नदी परीसंस्था, पर्यावरण, शेती, लोकजीवन यांच्याविषयी पौराणिक, ऐतिहासिक व नदीच्या सद्यस्थितीचे दाखले देत संत, समाज, शासन आणि महाजन यांच्या एकत्रित प्रयत्नातून चालू असलेल्या या प्रकल्पाच्या आवश्यकतेविषयी लोकांना आवाहन केले.



आलुर या गावी अतिवृष्टीच्या प्रसंगी नदीचे पाणी वाहित शेतीमधून गावात घुसत असे. कालांतराने नदीचे मुख्य पात्र बंद होऊन हा नालाच पुढे मुख्य नदी बनण्याचे चिन्हे दिसत होती. ग्रामस्थांनी केलेल्या सूचनेचा विचार करून नदीचे मूळ पात्र गाळ काढून प्रवाहित केले तसेच गावाला भविष्यकाळात धोका बनू पाहणाऱ्या नाल्याचा मार्ग बंद करण्यात आला. त्यामुळे गाव सुरक्षित राहील. हा नाला बंद केल्यानंतर नाल्यावरील अनेक शेतकऱ्यांनी नाल्याखालील जमीन सपाटीकरण करून शेतीत मिसळून घेतली. आलुरचे काम मे महिन्याच्या शेवटी संपले. केसराळी शिवारातील नदीपात्रात जूनच्या पहिल्या आठवड्यात काम सुरु केले. याठिकाणी सुद्धा



स्थानिक लोकांनी जबाबदारी घेवून काम गतिमान ठेवले. या गावी एक मोठा सिमेंट बंधारा आहे. काही वर्षांपूर्वी बंधाऱ्याकडेने नदीने वळण घेतल्यामुळे शेतजमिनीचे मोठे नुकसान झाले आहे. याठिकाणी नदीने घेतलेले हे नवीन वळण बंद करून बंधाऱ्यातून गेलेला मूळ प्रवाह परत चालू केला. १० जूनला केसराळीचे काम संपल्यानंतर देखील पावसाची कोणतीही लक्षणे दिसत नव्हती. त्यामुळे अटकळी येथील कामाला सुरुवात केली. अटकळी येथेसुद्धा स्थानिक लोकांनी जबाबदारी घेवून काम पूर्ण केले व ८ दिवसानंतर काम संपले. नदीकाठावरील शेतातील माती आणि पाणी तसेच नदी पात्रातील गाळाची तपासणी करण्यासाठी कृषी विज्ञान केंद्र सगरोळी येथील प्रयोगशाळेत नमुने देण्यात आलेले आहेत.

यादरम्यान मा. जिल्हाधिकारी डॉ. अभिजित राऊत, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर, जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री. हनुमंत खटके, तहसीलदार श्री. राजाभाऊ कदम, नाम फौंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गणेश थोरात आणि त्यांचे सहकारी यांनी वेळोवेळी प्रकल्पास भेट देवून मार्गदर्शन केले आणि कामाची गती वाढविण्याबाबत आवश्यक त्या सूचना दिल्या. ग्रामस्थ, शेतकरी, शासनाचे विविध शासकीय विभाग, प्रकल्प आणि संस्था यांच्यातील समन्वयकाचे काम संस्था कार्यकर्ते वसंत रावणगावकर यांनी केले तर प्रत्यक्ष गाव पातळीवरील प्रकल्प सनियंत्रणचे काम दिगंबर कोंडलाडे यांनी केले.



१ एप्रिल पासून कामाला सुरुवात होऊन ८६ दिवसानंतर २५ जून रोजी काम बंद झाले. या कालावधीत १३४० मीटर अंतरातील ५८०४२ घ.मी. गाळ उपसा करण्यात आला. हा गाळ २०० शेतकऱ्यांनी स्वखर्चाने वाहून नेवून ४८० एकर शेतात टाकलेला आहे. एकूण ८६ दिवसात ९३२ तास मशीन चालली. यातील काही वेळ झाडे झुडपे काढणे, रस्ता बनविणे, फसलेली ट्रॅक्टर इत्यादी वाहने काढणे आदी कामासाठी लागला. सुरुवातीला थोडा विस्कळीत असलेला शासनाच्या विविध विभागाशी समन्वय प्रकल्प काही दिवसातच मार्गी लागल्यावर सुरळीत झाला. विशेषतः दोन्ही मशीनला लागणारा दररोजचा डीझेल पुरवठा अखंडपणे चालू होता हे विशेषत्वाने नमूद करावसे वाटते. यासाठी जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री. हनुमंत खटके यांनी अतिशय तत्परतेने डीझेल पुरवठ्यासह इतर कामे सुरळीत करून दिली तर देगलूरचे तहसीलदार श्री. राजाभाऊ कदम यांनी नदी व शेत सिमांकनाचे प्रश्नी आस्थेने, सर्व प्रशासकीय कौशल्य वापरून अडचणी दूर केल्या. मा. जिल्हाधिकार्यांनी त्यांच्या अत्यंत व्यस्त दिनक्रमात वेळ काढून कामाच्या ठिकाणी भेटी दिल्या त्यामुळे कामातील गती कायम राहिली तसेच शेतकऱ्यांना त्यांचे प्रश्न थेटपणे मांडण्याची संधी मिळाली. हा सर्वच अनुभव संस्था कार्यकर्त्यासाठी नवा होता. भरपूर नवीन काही शिकायला मिळाले. झालेल्या चुका त्यावरील उपाय पुढील वर्षी घ्यायची दक्षता या गोष्टी लक्षात आल्या. हा कार्यक्रम पुढील २-३ वर्ष चालेल असे लक्षात आले. त्यादृष्टीने आत्तापासूनच तशी तयारी चालू आहे.

**आलेल्या अडचणी:**

- नदीची सिमा, शेतांच्या हद्दी बाबतीत शेतकऱ्यात संभ्रम असल्यामुळे अडथळे.
- सिंचनासाठी उन्हाळी पाळी पाणी सोडल्यामुळे नदीपात्रात पाणी येवून काम बंद पडत होते.
- बेमोसमी मोठ्या पावसामुळे कामात व्यत्यय.
- पर्यवेक्षण खर्च भागविणे
- गाळ वाहतुकीसाठी रस्ते.
- अचानकपणे उद्भवलेले स्थानिक सामाजिक प्रश्न
- शासनाच्या विविध शासकीय विभाग आणि प्रकल्प, संस्था, ग्रामस्थ यांच्यात समन्वयाचा अभाव
- जमिनीची धूप, क्षरण, नदीपात्राची सद्यस्थिती याची अचूक शास्त्रीय माहितीचा अभाव त्यामुळे

**करण्यात आलेले उपाय:**

- सिंचन विभागाला पत्र देवून काम सुरु असलेल्या पात्रात पाणी येवू देवू नये याची दक्षता घेण्याची विनंती केली.
- तालुका आणि जिल्हा भूमी अभिलेख अधिकारी यांचेशी चर्चा आणि लेखी विनंती करून, मा. जिल्हाधिकारी यांचे पत्र देवून पहिल्या टप्प्यातील नदीचे सीमांकन करण्यात आले.
- शेतकऱ्यांना भेटून समुपदेशन करून कामाचे महत्व पटवून दिले आणि त्यांचा सहभाग वाढविला.
- प्रत्येक गावी एका सक्षम समितीची स्थापना करण्यात येईल.
- या प्रकल्पासाठी ३ स्वतंत्र पूर्णवेळ कार्यकर्त्यांची निवड.
- शास्त्रीय माहितीसाठी रामभाऊ म्हाळगी प्रतिष्टान, मुंबई आणि भारतीय अवकाश संशोधन संस्थान (ISRO) यांचेशी सामंजस्य करार करण्यात येत आहे.

**पुढील नियोजन:**

- सन २०२३ च्या पावसाळयात वन विभागामार्गात नदीकाठावरील दुतर्फा बाबू लागवड करण्याचे नियोजन आहे.
- भूमी अभिलेख विभागाच्या मदतीने जानेवारी २०२४ मध्ये नदीची हद्द कायम करून घेण्यात येईल.
- वझीरगा ते गळेगाव शिवारात नदी ओलांडून जाण्या- येण्यासाठी एक पूल करणे गरजेचे आहे.
- पुढील वर्षी काम सुरु करण्यापूर्वी नदी काठावरील प्रत्येक गावात ग्रामसभा घेवून एक समन्वय समिती स्थापन करण्यात येईल.
- कृषी विज्ञान केंदाच्या वतीने शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करण्यात येईल. (जमीन आरोग्य पत्रिका समजावून सांगणे, कीड नियंत्रण, सेंद्रिय शेतीचे महत्व, पाण्याचा ताळेबंद ई.)